Vol 5 Issue 2 Aug 2015

ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

.....More

Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India
Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063

Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 2 | Aug - 2015

o|d'kkL=kpk fodkl % ,d ,frgkfld ekxkok

ch- Ogh- pk/kjh
ol/kjk dyk egkfo|ky;] tGs lkykiqj]
lkykiqj-

सारांश :

मानवी इतिहासामध्ये उत्क्रांतीवादाला अत्यंत महत्त्व आहे. मानव जसजसा विकसित होत गेला तसतसा विज्ञानाचा विकास होत गेला. विज्ञानाच्या विविध ज्ञानशाखापैकी अत्यंत महत्त्वाची आणि मानवी शरिर व भावना यांचा अभ्यास करणारी शाखा म्हणून वैद्यकशास्त्राचा जन्म झाला. मानव हा मृत्य प्राणी आहे, त्याला होणाऱ्या वेदना या विविध रोगांमुळे होतात. या रोगांपासून मुक्ती मिळविण्यासाठी निसर्गातील काही घटकांचा उपयोग करण्याचे ज्ञान अनुभवातून मानवाला मिळाले, त्यास औषध म्हणण्यात येऊ लागले.

प्रस्तावना :–

२१ व्या शतकापर्यंतची वैद्यकशास्त्राची प्रगती डोळे दिपविणारी आहे. या आश्चर्यकारक प्रगतीमुळे मानवी जीवन सुखी आणि संपन्न झाले आहे. मानवी जीवनात केवळ औषधाचे नव्हे तर उपचार करणाऱ्या डॉक्टरांचा रोग्यांकडे पाहण्याचा दृष्टीकोन व रोग्याला डॉक्टरांबद्दल आदर आणि विश्वास यास वैद्यकशास्त्रात अधिक महत्व आहे. रूग्णाची मानसिक अवस्था समजून घेणे महत्वाचे आहे. म्हणून आजच्या काळात सामाजिक शास्त्रातील सिध्दांत आणि तत्वांची जोड वैद्यकशास्त्रास देण्यात येत आहे. ही जोडणी कशी आहे हे पाहण्यापूर्वी भारत, आशिया, युरोप आणि इतर खंडातील वैद्यक इतिहासकारांचा मागोवा घ्यावा लागेल तरच आजच्या प्रगतीचा अर्थ कळू शकतो. विकसित आणि विकसनशील देश, ग्रामीण आणि शहरी श्रीमंत आणि गरीब या घटकांसोबत आरोग्य सेवांबाबत शासनाकडून जो भेदभाव केला जातो, त्यास सामाजिक अन्याय संबोधले जाते. वैद्यकशास्त्राचे ध्येय रूग्णावर उपचार करण्यासाठी औषधे निर्माण करणे हे राहिले नाही तर रोगच होऊ नये म्हणून रोग प्रतिबंधके तयार करण्याचे ध्येय झाले आहे.

प्राचीन काळी मानवी आरोग्याचा आणि आजारांचा विचार ग्रहनक्षत्र आणि मानववंश शास्त्र यांच्या संदर्भातच केला जात होता. चमत्कार आणि धार्मिक श्रध्दा याचा उपचार पध्दतीवर अधिक प्रभाव होता. या गोष्टी जगभरातील लोकांच्या संस्कृती व सुधारणांचा अविभाज्य भाग होता. वैद्यक इतिहासकारांच्या मतानुसार प्रत्येक संस्कृतीने व औषधशास्त्राची एक स्वतंत्र पध्दती निर्माण केली होती, ती विकसितही केली होती. प्राचीन वैद्यक विज्ञान हे सर्व विज्ञानाची जननी होती. वैद्यकशास्त्राने जगातील सर्व संस्कृतीमध्ये एकात्मता निर्माण करण्यात महत्वाची भूमिका वटविली होती. मानवी विकास आणि वैद्यकशास्त्र यांच्या अभ्यासातून असे दिसून येते की, तत्वज्ञान, धर्म, आर्थिक परिस्थिती, शासनाचे स्वरूप व शिक्षण यांच्या अभ्यासाची स्फुर्ती आणि प्रेरणा यातून निर्माण झाली. औषधांचा जन्म हा सहानुभूतीमधून झाला आहे तर सहानुभूती ही गरजेतून निर्माण झाली आहे. पहिला डॉक्टर हा पहिला मानव होता व पहिली स्त्री ही पहिली नर्स होती. इतिहासपूर्व काळातील माणूस हा सहानुभूती व दयाळूपणा यातून स्फुर्ती व प्रेरणा घेऊन वैद्यकशास्त्राकडे वळला होता. हे मानवाला वेदनादायक व रूग्णपणाच्या काळातील वर्तनावरून दिसून आले. कारण प्राचीन काळी मानवी आजारपण शारिरीक पिडा, वेदना व रोग हे इश्वरी अवकृपेमुळे होतात असा समज रूढ होता.

• भारतीय वैद्यकशास्त्रज्ञ :–

खऱ्या अर्थाने भारतात जन्माला आलेले वैद्यकशास्त्र म्हणजे आयुर्वेद व सिध्द पध्दती होय. आयुर्वेदाचा वापर भारतात सर्वत्र होत असे, सिध्द पध्दतीही दक्षिण भारतातील तामिळ भाषिक प्रदेशात वापरली जात होती[7]. या दोन्ही पध्दतीत सिध्दांत आणि व्यवहाराच्या दृष्टीने फारच किरकोळ फरकाच्या होत्या. आयुर्वेदाचा अर्थ जीवनाचे ज्ञान किंवा दिर्घायुष्याचे ज्ञान असा होता. याचे मुळ वेद काळात म्हणजे इ.स.पूर्व ५००० वर्षे जुने आहे. हिंदुची आरोग्य देवता धन्वंतरी हीचा जन्म देव व दानव यांच्या समुद्र मंथनामधून झाला होता असा समज आहे. काही इतिहासकारांच्या मते भारतीय वैद्यकशास्त्राचा जन्म आयुर्वेदाचा विकास होऊन त्यातून जे शास्त्र उदयाला आले त्यास आयुर्वेद हे नाव मिळाले.

प्राचीन भारतातील प्रसिध्द वैद्यक आत्रेय, चरक, सुश्रुत आणि वाक्भट हे होते. आत्रेय हा इ.स. पूर्व ८०० मध्ये होऊन गेलेला पहिला भारतीय वैद्यक प्राध्यापक होता. तो तक्षशिलाचा विद्यार्थी होता, बौध्द काळात आयुर्वेदाचा प्रचंड विकास झाला. अशोकाने आपल्या कारकिर्दीत आयुर्वेदास राजाश्रय दिला होता. राजमान्यता मिळाल्याने रूग्णालयातील उपचार पध्दती आयुर्वेदिक होत्या. कनिष्काच्या राजदरबारी वैद्यक चरक याने चरक संहिता लिहिली. भारतीय वैद्यकशास्त्राच्या इतिहासामध्ये प्रसिध्द वैद्यक व भारतीय शल्य चिकित्सेचा जनक सुश्रुत याने फार मोलाचे स्थान आहे[२]. सुश्रुत संहितेत शल्य चिकित्सेचे ज्ञान आहे. हा ग्रंथ शल्य चिकित्सेवर असला तरी त्यात औषधे, वैद्यक प्रयोगशाळा, शरिररचनाशास्त्र, दृष्टीशास्त्र, प्रसुतीशास्त्र, आरोग्यशास्त्र व जीवनशैलीशास्त्र यांची अत्यंत उपयुक्त माहिती आहे. या काळात या ग्रंथाच्या आधारे भारतीय वैद्यकाकडून हाडे जोडणे, गाठी काढणे व इतर अनेक प्रकारच्या शल्यचिकित्सा केल्या जात होत्या. ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीच्या काळात ब्रिटिश डॉक्टर भारतीय डॉक्टरांकडून (Rhinoplasty) जीभेच्या, नाकाच्या शल्यक्रियेची कला शिकले[३].

आयुर्वेदात त्रिदोष पध्दतीला महत्व होते. मानवाची प्रकृती ही तीन प्रकारच्या प्रवृत्तीवर अवलंबून असतो, त्यात संतुलन राहिले तर मनुष्य निरोगी राहतो. परंतु काही कारणास्तव त्यातील संतुलन बिघडले की माणूस आजारी होतो. वात, पित्त आणि कफ ही तीन तत्त्वे म्हणजे ग्रीकांच्या वैद्यकशास्त्राच्या इतिहासकारांच्या मताप्रमाणे हिंदु, अरब, पर्शियन, ग्रीक आणि ज्यु विद्वान आपल्या वैद्यक विचारांची आणि ज्ञानाची मुक्तपणे देवाण-घेवाण करीत होते. ९ व्या शतकात चरक आणि सुश्रुत यांच्या संहिता पर्शियन आणि अरेबिक भाषेत भाषांतरीत झाल्या होत्या.

आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छतेस अधिक महत्त्व दिले जात होते. सिंधु संस्कृतीतील मोहेजोंदारो व हडप्पा येथील लोकांच्या आरोग्य विषयक कल्पना अत्यंत प्रगत होत्या हे तेथील सांडपाणी व्यवस्था, पाणी पुरवठा व्यवस्था, रस्ते, घरांची रचना व अभियांत्रिकी ज्ञानावरून सिध्द होते. पुढील काळात राजाश्रयाअभावी वैद्यकशास्त्राची प्रगती होऊ शकली नाही. मध्ययुग तर विज्ञानाचे अंधार युगच होते. वैद्यकशास्त्राच्या इतिहासकारांच्या मते भारतीय वैद्यकशास्त्राने आशिया खंडात ते कार्य केले आहे, जे ग्रीक वैद्यकशास्त्राने युरोप खंडात केले व अरब राष्ट्रातही केले. भारताने इंडोनेशिया, इंडोचायना, तिबेट, मध्य आशिया आणि जपानमध्ये आपल्या वैद्यकशास्त्राच्या ज्ञानाचा वापर केला होता[४].

भारतात या वरील पध्दती शिवाय इतर कांही वैद्यक पध्दतीचा वापर केला जात होता. त्यात युनानी आणि होमोपॅथी यांचा समावेश होता. युनानी पध्दती ही प्राचीन ग्रीक वैद्यक पध्दती होती. या पध्दतीची सुरूवात भारतात मुसलमान राजवटीपासून झाली. भारतात १० व्या शतकापासून १३ व्या शतकापर्यंत ही लोकप्रिय वैद्यक उपचार पध्दती होती. विशेषतः दिल्ली, अलिगढ, लखनौ, हैद्राबाद इत्यादी शहरांमध्ये राजाश्रयाने युनानी वैद्यक लोकांवर उपचार करीत होते. होमोपॅथी या वैद्यक उपचार पध्दतीची सुरूवात भारतात हायनेमन याने सुरू केली. निरोगी माणसामध्ये रोगाची काही लक्षणे दिसू लागताच अल्प प्रमाणात औषधे देऊन उपचार केले जातात. मुळची ही पध्दती जर्मनीमधील आहे. जगात सर्वात ही पध्दती वापरली जाते तरी भारतात होमोपॅथींची संख्या सर्वाधिक आहे. भारतीय जीवन पध्दतीचा एक भाग म्हणून ग्रामीण भागातील लोकांना या वैद्यक पध्दतीचा आधार वाटतो[५].

चीनमध्ये इ.स. पूर्व २७०० पासून जगात सर्वात प्रथम चीनी वैद्यकांना वैद्यकशास्त्राचे ज्ञान होते. त्यांची यांग आणि यीन उपचार पध्दती होती. यांग ही पुरूषी तत्त्वावर तर यीन ही नकारात्मक स्त्री तत्त्वांवर आधारित होती. या दोन्ही परस्पर विरोधी तत्त्वांचे संतुलन म्हणजे आरोग्य अशी चीनी धारणा होती. चीनमध्ये सर्वात प्रथम रोग प्रतिकारकांची निर्मिती केली जात होती. देवीचा रोग होऊ नये म्हणून चीनी डॉक्टर उपाययोजना करीत असत[६].

• *इजिप्शीयन वैद्यकशास्त्रज्ञ :–*

इजिप्त अत्यंत प्राचीन असा सुधारणावादी देश आहे. इ.स. पूर्व २००० मध्ये इजिप्त देशात पापिरसच्या पानावर चित्र लिपीमध्ये लेखन केले जात होते. त्यांची प्राचीन औषधे ही धर्माशी जोडलेली होती. इजिप्शीयन डॉक्टर हे चर्चमध्ये असलेल्या शाळांमधून धर्मगुरूच्या बरोबरीचे ज्ञान त्यांना आहे, असे समजून प्रशिक्षण देण्यात येत होते. चर्चमध्ये उपचारासाठी आलेल्या रूग्णांना धर्मगुरू मदत करीत असत. इजिप्तमध्ये वैद्यकांना प्रत्यक्ष शरिररचना शास्त्राचे प्रात्यक्षिक करू दिले जात नव्हते. कारण इजिप्शीयन धर्म विज्ञानावर आपले वर्चस्व टिकवून होता. इम्होटेपच्या काळात वैद्यकशास्त्रात प्रगती झाली. इम्होटेप हा मोठा विचारवंत वास्तुशास्त्रज्ञ सृजनशील डॉक्टर होता. त्यांच्या काळात इजिप्तमध्ये डोळ्याचे व दाताचे तज्ञ वैद्यक असल्याचे पुरावे मिळतात. होमरच्या मतानुसार इजिप्तमधील वैद्यक सर्वश्रेष्ठ होते[७].

इजिप्तमधील वैद्यकांची अशी समजुत होती की, अन्नातून जंतु अन्ननलिकेत जातात. आतड्यातून जंतु शोषले जातात व रोग होतो. एडवीन स्मीथ हा एक महान वैद्यक होता. डोक्याच्या कवटीची त्याने यशस्वी शल्य चिकित्सा केली होती. नाईल नदीच्या किनाऱ्यावर सापडलेल्या ममी सोबतच्या पत्रावरून त्यांना पोलिओ, डायबेटिस रोगांची माहिती होती.टरपेंटाइन, आफू यांचे उल्लेख आहेत. त्यावेळच्या वैद्यकांनी लिहिलेले रोग आजही इजिप्तमध्ये आहेत. सार्वजनिक आरोग्याच्या बाबतीत इजिप्शीयन अत्यंत प्रगत होते, त्यांनी नियोजन करून शहरे उभारली होती. त्यांना देवीच्या रोगावर उपचार पध्दती माहिती होती. प्लेग उंदरामुळे होतो, तसेच डांसामुळे रोग होतो म्हणून मच्छरदाणी त्यांनी तयार केली होती. ग्रीक वैद्यक इजिप्शीयनांची जागा घेईपर्यंत प्राचीन जगात इजिप्शीयन सर्वोच्च स्थानावर होते[८].

• *प्राचीन मेसोपोटेनियन वैद्यकांची प्रगती :–*

तैग्रीस आणि युफ्राटीस नद्यांच्यामधील प्रदेशातील संस्कृतीस मेसोपोटेमियन संस्कृती असे म्हणतात. या संस्कृतीमध्ये जटीबुटी देणाऱ्या पासून शल्य चिकित्सा करणाऱ्या पर्यंतचे वैद्यक होते. वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी रोगांच्या वेगवेगळया

कारणांचा पृथःकरणाचे प्रयोग करण्यात गुंतले होते. सुमेरियन असेरियन वैद्यकांची औषधे संपूर्ण युरोपियामध्ये मान्यता प्राप्त तर होतीच त्याच बरोबर लोकप्रिय पण होती. त्या काळी हम्मुराबीची कायदे संहिता कडकपणे पाळली जात होती. चूक करणाऱ्या वैद्यकांना कडक शिक्षा केल्या जात होत्या. आपल्या नागरिकांच्या आरोग्याची काळजी राजकर्ते सजगपणे घेत होते.

• *ग्रीक वैद्यकशास्त्रज्ञांच्या प्रगती :–*

वैद्यक इतिहासकारांच्या लिखाणावरून असे म्हणता येते की, ग्रीकांनी सर्व प्रथम का ? आणि कसे ? या प्रश्नांवर विचार करायला शिकविले आहे. हिप्पोक्रॅटस हा औषधशास्त्राचा जनक समजला जातो. हिप्पोक्रॅटसची व्याख्याने आणि लिखाण या ग्रंथाची २१ खंडातील माहिती आरोग्य शास्त्राची नीती तत्त्वे ठरविण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. वैद्यकशास्त्रातील सर्वश्रेष्ठ निपुण वैद्यक उच्च नितीचा विद्वान म्हणून हिप्पोक्रॅटस मानव जातीला माहित आहे. वातावरण, पाणी, आहार, खाण्या.पिण्याच्या सवयी यामुळे रोग उत्पन्न होतात, अशी त्यास खात्री होती. मानव आणि वातावरण यांच्यामुळे रोगांचा शोध घेता येतो[९].

आरोग्य विषयक विचारांना दिशा देण्याचे काम ग्रीकांनी केले. रोग हे दैवी कारणांमुळे होतात, हा सिध्दांत मोडीत काढला. रोगांची कारणे नैसर्गिक आहेत, हा विचार ग्रीकांना मांडला. त्यांचा हवा, पाणी आणि स्थळे हा ग्रंथ सामाजिक, आरोग्य व स्वच्छता यातील एक करार ठरला. जग हे पृथ्वी, अग्नि, पाणी व हवा यांनी बनले आहे. यावर त्यांचा विश्वास होता व त्याचा मानवी जीवनावर परिणाम होतो. यात संतुलन राहिले नाही तर रोग होतात, याचे ज्ञान ग्रीकांना झाले होते.

हिप्पोक्रॅटोत्तर काळात वैद्यकशास्त्राचे वेगळेपण जपणारे महत्त्वाचे केंद्र म्हणजे अलेक्झांड्रीया विद्यापीठ होते. जगातील पहिल्या विद्यापीठ संग्रहालय ज्यात ७० हजार ग्रंथ होते. या पहिल्या केंद्रातून असंख्य वैद्यक बाहेर पडले. अथेन नंतरचे हे महत्त्वाचे केंद्र होते, त्यानंतर रोमन वैद्यकाचा कालखंड सुरू होतो[१०].

• *रोमन वैद्यकांची कामगिरी :–*

इ.स. पूर्व १ ल्या शतकात वैद्यक क्षेत्रातील सुधारणांचे केंद्र रोमकडे गेले. रोमनांनी ग्रीक वैद्यकाच्या कल्पना उचलल्या तरी रोमन ग्रीकांपेक्षा अधिक वास्तववादी होते. सांडपाणी, स्वच्छता या विषयाच्या जागृततेमुळे रोममध्ये सार्वजनिक आरोग्याचा जन्म झाला. रोमनांनी व्यक्तीगत स्वच्छतेमध्ये स्नानाचे महत्त्व ओळखले होते. संपूर्ण साम्राज्यामध्ये रस्त्याचे जाळे निर्माण करून सर्व शहरातील लोकांना स्वच्छ आणि शुध्द पाण्याची व्यवस्था केली होती. त्यांनी मैला आणि घाण पाणी वाहून जाण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण केली होती.

गॅलेन हा रोमन साम्राज्यातील प्रख्यात वैद्यक होता. रोग आणि आरोग्य या बाबतीत गॅलेन आपल्या काळाच्या फार पुढे होता. आरोग्य चांगले कसे राहिल याकडे आपण प्रयत्न पूर्वक लक्ष दिले पाहिजे, तीन घटक आजाराला कारणीभूत असतात. हिप्पोक्रॅटस व गॅलेन यांच्या वर्तनाच्या सवयीमध्ये वैचारिक मतभेद होते. गॅलेन हा त्याच्या काळातील वैद्यकशास्त्रातील हुकुमशहा होता, त्याच्या लिखाणाचा युरोपातील वैद्यकशास्त्रावर प्रभाव पडला होता, त्याचे ग्रंथ १४ शतके वैद्यकशास्त्रातील प्रमाण ग्रंथ मानले जात होते. १५०० वर्षानंतर १६२८ मध्ये विल्यम हार्वे याने त्याच्या सिध्दांतात आव्हान देईपर्यंत ते प्रचलित होते[११].

• *मध्ययुगीन वैद्यकशास्त्रातील प्रगती :–*

जगाच्या इतिहासात इ.स. ५०० ते इ.स. १५०० पर्यंतचा कालखंड हा मध्ययुगीन कालखंड म्हणून समजला जातो. या कालखंडाचे दोन भाग आहेत. (१) इ.स. ५०० ते इ.स. १०००, (२) इ.स. १००० ते इ.स. १५०० रोमन साम्राज्याच्या पतनानंतर रोमनांनी स्थान केलेली वैद्यकशास्त्राच्या अभ्यासाची केंद्र लयास गेली. वैद्यकशास्त्राची अधोगती झाली. पटकी, देवी, कुष्ठरोग, क्षयरोग इत्यादी रोगांमुळे युरोपियनांचे जीवन दुःखमय झाले होते. मानवी शरिराचे विच्छेदन करणे निषिध्द मानले जाऊ लागले. अंधश्रध्देने संपूर्ण समाज व्यापला होता, वैद्यकशास्त्रातील प्राचीन समजुतीवर आधारित उपचार पध्दती प्रबळ झाल्या होत्या. ज्या वेळेस युरोप विज्ञानाच्या अंधार युगात चाचपडत होता, तेंव्हा अरब देशांनी युरोपातील वैद्यकशास्त्राच्या ग्रीको-रोमन ग्रंथांचे अरबी भाषांतरे केली. त्यामुळे वैद्यकशास्त्रातील प्राचीन ज्ञानाचे जतन झाले. स्वतःची वैद्यकशास्त्राची युनानी पध्दती विकसित केली, त्यांनी वैद्यकशास्त्राच्या संस्था व रूग्णालयांची स्थापना केल्या. बगदाद, दमास्कास कैरो आणि इतर इस्लामिक शासनाच्या राजधान्यांच्या ठिकाणी युनानी वैद्यक पध्दतीचे शिक्षण देण्यात येऊ लागले. आबुबकर (यास राझेस ही म्हणत) इब्नसिना हे महत्वाचे वैद्यक होते. आबुबकर हा बगदादमधील मोठया हॉस्पिटलचा संचालक होता, तो राजवैद्यही होता, त्याने लहान मुलांच्या रोगांवर पहिला ग्रंथ लिहिला. त्याने देवी आणि गोवर रोगावर लिहिलेले ग्रंथ वैद्यकशास्त्राला त्याची देणगी आहे. इब्नसिना हा युरोपात अविसेन्ना म्हणून ओळखला जात होता. त्याने २१ खंडाचा वैद्यकशास्त्राचा ज्ञानकोष तयार केला. सिध्दांत आणि तत्त्वे यांचा व्यवहारामध्ये अत्यंत मार्गदर्शक पध्दतीने वापर करता आला.

अरबांचे वैद्यकशास्त्रातील सर्वात महत्त्वाचे योगदान म्हणजे औषधशास्त्राची निर्मिती होय. औषधी रसायनशास्त्रातील अनेक रासायनिक द्रवांच्या त्यांनी शोध लावला. विविध प्रकारचे काढे निर्माण केले. अल्कोहोल, सिरप, शुगर हे अरबी शब्द आहेत. इ.स. ८०० ते १३०० हा अरबी वैद्यकशास्त्राचा सुवर्णकाळ होता[१२]. मध्ययुगात रसायनशास्त्रात झालेल्या प्रचंड विकास रूग्णालये स्थापनेस हातभार लावणारा ठरला. मध्ययुगात प्रत्येक रोगाच्या उपचारासाठी स्वतंत्र रूग्णालये नव्हती. जगातील पहिले रूग्णालय इ.स. ६३७ मध्ये इंग्लंडमधील योर्क येथे स्थापन झाले. औषधाच्या वाढीसाठी बरोबरच पर्शियापासून स्पेनपर्यंत रूग्णालयांची एक साखळी निर्माण झाली. यावेळी बगदादमध्ये ६० पेक्षा अधिक व कैरोमध्ये ३३ पेक्षा अधिक रूग्णालये होती. कैरोच्या अलमन्सर रूग्णालयात प्रत्येक रोगाच्या रूग्णांसाठी स्वतंत्र विभाग होता. स्त्री-पुरूष रूग्णांसाठी स्वतंत्र कक्ष होते. तापाच्या रूग्णांसाठी थंड हवेचे फवारे, ग्रंथालये,

निद्रानाशाच्या रूग्णांसाठी संगीतकार व कहाणी सांगणारे लोक नियुक्त केलेले होते.

मध्ययुगात धर्मगुरूंच्या अधिपत्याखाली सर्व धार्मिक ठिकाणे होती. त्याठिकाणी स्त्री-पुरूष, राजा-राणी सर्वांना उपचार मिळत होते. याठिकाणी केवळ औषधोपचार केले जात नव्हते तर रूग्णांची सेवा शुश्रुषा पण केली जात होती.

इ.स. १५०० नंतरचा काळ हा आधुनिक काळ म्हणून समजला जातो. या काळात राजकीय, औद्योगिक, धार्मिक, वैज्ञानिक क्षेत्रांत क्रांत्या घडून आल्या व लोकांनी आपले हक्क मागितले. औद्योगिक क्रांतीने लोकांच्या जीवनमानात प्रगतीकारक बदल घडून आला. त्यात वैद्यकशास्त्राचाही विकास झाला.

युरोप शेकडो वर्षांच्या निद्रेतून जागा होत असतानाच अनेक वैद्यकशास्त्रज्ञांनी नव-नवे शोध लावले. पॅरासेसस हा त्या काळाचा प्रतिनिधी होता. संसर्गजन्य रोगाच्या शास्त्राचा जनक इटालियन वैद्यक फ्रॅकास्टेरियस हा याच काळात होऊन गेला. शरिर रचना शास्त्राचा विकास झाला. गॅलेनच्या चूका दाखवून नवीन सिध्दांत प्रस्थापित करण्यात आले. पॅरे हा फ्रेंच लष्करी अधिकारी शल्य चिकित्सक आधुनिक शल्यशास्त्राचा जनक समजला जातो. याच काळात १५४० मध्ये इंग्लंडमध्ये जी संस्था स्थापन झाली तिच पुढे रॉयल कॉलेज ऑफ सर्जन्स म्हणून ओळखली जाते. थॉमस सिडने हॅम या सातव्या शतकातील वैद्यकाने विविध रोग निदानच्या नव्या पध्दती शोधून काढल्या.

१७ व्या आणि १८ व्या शतकातील वैद्यकशास्त्राचे शोध लागले ज्याचा परिणाम मानवी जीवन सुखी आणि समृध्द होण्यास झाला. हार्वेचा रक्ताभिसरणाचा शोध, लिवेनहोकचा सुक्ष्मदर्शक यंत्राचा शोध, एडवर्ड जेन्नची देवीची लस यासारख्या शोधानी वैद्यकशास्त्रात नवनवीन शाखा उदयास आल्या.

प्राचीन काळातील किंवा मध्ययुगातील आरोग्य विषयक समजूती व सुविधा आधुनिक काळात बदलल्या आहेत. आजचा वैद्यकशास्त्राचा विस्तार पाहिला तर आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. परंतु हा विकास टप्प्या-टप्प्याने झालेले आहे. अतिविशेषीकरण असलेली रूग्णालये प्रत्येक रोगासाठी वेगळी रूग्णालये, प्रत्येक शल्यचिकित्सेकरीता स्वतंत्र वैद्यक भुलशास्त्रज्ञ शेकडो शाखामधून मानवी सेवा केली जात आहे. याचाही एक स्वतंत्र अभ्यास करता येईल.याठिकाणी फक्त प्राचीन व मध्ययुगीन वैद्यकशास्त्रातील बदलांचा इतिहास उलगडण्याचा प्रयत्न केला आहे.

संदर्भ ग्रंथ

१.गोखले बी. व्ही. : हिंद, दिल्ली १९३०, पृ. १६२
२.भाटिया एस. एन. : हिस्ट्री ऑफ मेडिसीन, दिल्ली १९८४, पृ. २७०
३.पारेख डेव्हिस : ग्रेट मुव्हमेंटस इन मेडिसीन, पारेख डेव्हिडस् ॲण्ड कंपनी, १९६१, पृ. ११
४.कित्ता : पृ. २४०
५.जागतिक आरोग्य संघटना : वर्ल्ड हेल्थ, जुलै १९८४
६.हॉपसन डब्ल्यु. : वर्ल्ड हेल्थ ॲण्ड हिस्ट्री, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी, लंडन, १९६५
७.जागतिक आरोग्य संघटना : वर्ल्ड हेल्थ, में १९७०, पृ. २१
८.अंडरसन सी. एल. : कम्युनिटी हेल्थ, पृ. २९
९.पारेख डेव्हिस : ग्रेट मुव्हमेंटस इन मेडिसीन, पारेख डेव्हिडस् ॲण्ड कंपनी, १९६१, पृ. ५११
१०.कार्क एस. एल. : इपिडेमिओलोजी ॲण्ड कम्युनिटी मेडिसिन, लंडन, १९७४, पृ. २११
११.रायझर एस. एल. : वर्ल्ड हेल्थ फॉरम, १९८०, पृ. १०३
१२.गुथराई डग्लस : अ हिस्ट्री ऑफ मेडिसीन, थॉमस नेल्सन ॲण्ड सन्स्, १९४७, पृ. ११

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org